ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख २५ मे, १९५५ | अंक २१

## विविध माहिती

**दिल्लींत मद्यविरोधी धोरण**—दिल्ली येथील रेस्टॉरंटसमधून १८ वर्षे वयाच्या खालील तरुणांना मद्य देण्यांत येणार नाहीं. एक्साइज कमिशनरनें एक हुकूम काढून ह्या लोकांना मद्य देणें हा गुन्हा असल्याचें जाहीर केलें आहे. मद्यपानाला प्रतिबंध करण्याच्या राज्य-सरकारच्या धोरणानुसार वरील बंदी करण्यांत आली आहे.

**इराकमध्यें तेल-वहातुकीचे नवे नळ**—इराक पेट्रोलिअम कंपनीनें सिरिआंतील हॉम्स ह्या शहरापासून लेबॅनॉनमधील ट्रिपोली ह्या शहरापर्यंत ७५ मैल लांबीचे तेल वाहून नेणारे नळ टाकण्याचें ठरविलें आहे. इराकमधील किरकुक ह्या तेलाच्या प्रदेशांतील खाणींपासून अधिक उत्पादन होऊं लागल्यामुळें ही व्यवस्था करावी लागत आहे.

**बल्लारी जिल्ह्यांत शिशाच्या खाणी**—बल्लारी जिल्ह्यांतील हॉसपेट तालुक्यांतील १५० चौरस मैल प्रदेशांत शिशाची माती सांपडली आहे. ह्या मातीची तपासणी करण्यांत आली असतां तींत ८० टक्के शिसें असल्याचें दिसून आलें आहे. ह्या खाणी व्यापारी दृष्टीनें किफायतशीर होतील, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**सुखद हवा राखणाऱ्या मोटारबसेस**—पठाणकोट ते श्रीनगर हा प्रवास सुखद हवामान राखणाऱ्या मोटारबसेस मधून करण्याची सोय काश्मिर सरकारतर्फे करण्यांत येणार आहे. अशा प्रकारच्या मोटारी विकत घेण्यासाठी काश्मिरचें सरकार मोटारीच्या कारखानदारांशीं वाटाघाटी करीत आहेत. पठाणकोटहून रोज सुमारें ४०० प्रवासी हंगामाच्या दिवसांत श्रीनगरला जातात.

**औद्योगिक उपयोगासाठी खड्यांचें उत्पादन**—लखनौ येथील सरकारी प्रिसिजन इन्स्ट्रुमेंटस फॅक्टरीमध्यें औद्योगिक उपयोगासाठी जरूर असणारे मौल्यवान् खडे तयार करण्याचें घाटत आहे. गेल्या वर्षी कारखान्यानें अशा प्रकारचे १,००० रत्नाचे खडे स्वित्झरलंडहून आयात केले. चालू वर्षासाठी २०,००० हजार खड्यांची मागणी करण्यांत आली आहे.

**उत्तर-प्रदेश सरकारला कर्ज**—गेल्या वर्षी उत्तर-प्रदेश राज्यानें छोट्या बचतीच्या कार्यक्रमांत ४·५ कोटी रुपये जमविण्याचें ठरविलें होतें. प्रत्यक्ष जमा मात्र ९·५१ कोटी रुपये झाली. उद्दिष्टापेक्षा जितकी रक्कम अधिक जमविण्यांत येईल तितकी राज्यसरकारला कर्ज म्हणून देण्यांत येईल असें मध्यवर्ति सरकारनें कबूल केलें होतें. त्याप्रमाणें सुमारें ५ कोटी रुपयांचें विकास-कर्ज देण्यांत येणार आहे.

**त्रावणकोर-कोचीन राज्यांतील शाळा**—पुढील शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीपासून त्रावणकोर-कोचीन राज्यांत १०० नव्या शाळा सुरू करण्यांत येणार आहेत. त्यापैकी ६० शाळा दुय्यम शिक्षणाच्या असून ४० प्राथमिक शिक्षण देणाऱ्या आहेत. त्रावणकोर-कोचीन राज्यांत माध्यमिक शिक्षणापर्यंतची सोय मोफत आहे.

**नागपूर येथील नवा स्टेडिअम**—नागपूर कॉर्पोरेशननें शहरांत खेळांसाठी एक नवा आखाडा बांधण्याचें ठरविलें आहे. स्टेडिअम बांधण्यासाठी १० लाख रुपये खर्च येणार असून त्यापैकी निम्मा खर्च देण्याचें कॉर्पोरेशननें कबूल केलें आहे. बाकीचा खर्च राज्य सरकार देणार आहे.

**अरबस्तानसाठी भारताचा तांदूळ**—अरबस्तानच्या सरकारकडून भारताकडे तांदुळाची मागणी करण्यांत आल्यामुळें उभयता सरकारांच्या प्रतिनिधींत ह्यासंबंधीं औपचारिक व्यापारी बोलणीं सुरू झालीं आहेत. करार झाल्यावर मामुली व्यापारी पद्धतीनें भारताकडून अरबस्तानला तांदुळाचा पुरवठा करण्याचें भारतीय सरकारनें मान्य केलें आहे.

**धरणासंबंधीं आंतरराष्ट्रीय काँग्रेस**—मोठ्या धरणांसंबंधींच्या आंतरराष्ट्रीय काँग्रेसचें ५ वें अधिवेशन पॅरिस येथें ता. २१ मे पासून ४ जूनपर्यंत भरणार आहे. भारतीय सरकारनें परिषदेला आपल्यातर्फे प्रतिनिधी पाठविण्याचें ठरविलें आहे. हिराकूद धरणाचे मुख्य एंजिनिअर श्री. अय्यंगार हे प्रतिनिधी-मंडळाचे नेते म्हणून जातील.

**स्त्रियांना घरीं काम देण्यासाठी**—स्त्रियांना घरबसल्या काम करून कुटुंबाच्या उत्पन्नांत भर घालतां यावी म्हणून सेंट्रल वेल्फेअर बोर्डानें हैद्राबाद येथें काड्याच्या पेट्यांचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. राज्य सरकार व मध्यवर्ती सरकार, दोघांनींहि कारखान्याचा पुरस्कार करण्याचा निर्णय घेतला आहे.

**पेट्रोलचा नवा कारखाना**—भारतांत कृत्रिम पेट्रोलचा कारखाना काढण्याचा भारतीय सरकारचा विचार चालू आहे. ह्या कामीं एका जर्मन कंपनीचें साह्य घेण्यांत येत असून कंपनीचा अहवाल दोन-तीन महिन्यांत सरकारला सादर करण्यांत येणार आहे. सध्यां उत्पादन खात्याच्या अधिकाऱ्यांशीं जर्मन तज्ज्ञांच्या वाटाघाटी चालू आहेत.

**रांडेर म्युनिसिपालिटीची योजना**—सुरत जवळील रांडेर गांवच्या म्युनिसिपालिटीनें गांवासाठी स्वतंत्र पाणीपुरवठ्याची योजना तयार केली आहे. ह्या कामासाठी म्युनिसिपालिटीनें ५२,००० रु. नॅशनल प्लॅन लोनमध्यें गुंतविले आहेत.

**१६ व्या शतकांतील समुद्राचा नकाशा**—बर्लिन येथें सोळाव्या शतकांत छापलेल्या एका सागरी नकाशाचा लिलांव करण्यांत आला. लिलांवांत ८ जणांनीं स्पर्धा केली. पण अखेर एका ब्रिटिश नागरिकानें तो १०० पौंडाला विकत घेतला. हा नकाशा हॉलंडमध्यें १५८४ सालीं छापण्यांत आला असून तशा प्रकारचा तो पहिलाच नकाशा आहे.

**बुद्धाची २,५०० वी पुण्यतिथि**—भगवान् गौतम बुद्धाची २,५०० वी पुण्यतिथी साजरी करण्यासाठी भारतीय सरकारनें एक खास समिति स्थापन केली आहे. समितीच्या बिहार शाखेनें अशी सूचना केली आहे, कीं ह्या निमित्तानें बुद्ध-गया आणि राजगड ह्या ठिकाणीं रस्ते व इमारती ह्यांच्यासाठी ४७·७० लाख रुपये खर्च करण्यांत यावेत.

**बेफाम वेडावर औषध**—ब्रिटनमधील डॉर्चेस्टर येथील वेड्यांच्या इस्पितळांत एक बेफाम वेडा होता. तो प्रत्येक रात्रीं एक ब्लँकेट फाडून टाकीत असे आणि पलंगाचे लाकूड दांतांनीं कुरतडत असे. त्याला ‘ रिसपाईन ’ नांवाचें औषध दिल्यावर तो बरा झाला. अमेरिकन इंडिअन्स हें औषध एक प्रकारच्या कंदापासून तयार करतात.

**पेप्सु सरकारला मदत**—पेप्सु राज्यानें १९५५–५६ सालीं जमिनीची धूप थांबविण्याचा व इतर सुधारणा करण्याचा कार्यक्रम आखला आहे. ह्या कामासाठीं राज्य सरकारला जितका खर्च येईल, त्यापैकीं निम्मा खर्च भारतीय सरकार देणार आहे. राज्य-सरकारला ६,३८,५०० रुपयांची मदत मंजूर करण्यांत आली आहे.


**मध्यप्रदेशांतील सौंदर्यस्थलें**—हौशी प्रवाशांनीं भेट देण्यास योग्य अशीं अनेक सौंदर्यस्थलें मध्यप्रदेशांत विखुरलेलीं आहेत. त्यांची सुधारणा व विकास घडवून आणून प्रवाशांना आकर्षित करण्याचें राज्य-सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठी चालू आर्थिक वर्षांत १ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

**दिल्लींत नवें इस्पितळ**—दिल्ली येथें तीरथ राम शहा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे एक नवें इस्पितळ बांधण्यांत आलें आहे. श्री. तीरथ राम शहा हे पूर्वीच्या वायव्य सरहद्द प्रांतांतील प्रसिद्ध दानशूर गृहस्थ होते. त्यांच्या स्मरणार्थ इस्पितळ बांधण्यांत आलें आहे. इस्पितळांत सर्व रोगांवर उपचार करण्याची अद्यावत् सामुग्री आहे.




किर्लोस्कर

हात पंप | सेंट्रिफ्युगल पंप



उन्हाळी पिकासाठी व
घरगुती पाणीपुरवठ्यासाठी
खात्रीची उपाययोजना

—अधिक माहिती मागवा—

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी.

कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

पृ. सं. १६८ ] दुसरी आवृत्ति [ किं. २॥ रु.

र. पु. परांजपे, ना. सी. फडके, शं. वा. किर्लोस्कर, चिं. वि. जोशी, वि. द. घाटे, इरावती कर्वे, इंदिराबाई देवधर, केसरी, सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र, किर्लोस्कर, इत्यादींचे उत्कृष्ट अभिप्राय.

डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणें, कडून पुरस्कार.

सर्वत्र मिळतें. स्वतः वाचा, संग्रहीं ठेवा, आणि भेटीदाखल द्या.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २. ( टे. नं. २७६३ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,२४,९१० |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

# अर्थ

बुधवार, ता. २५ मे, १९५५

संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे




## दशमान पद्धतीचीं नाणीं लवकरच सुरू होणार

सबंध भारतांत एकाच पद्धतीचीं वजनें व मापें सरकारनें सुरू करावीं व इतर वजनें-मापें वापरणें दंडनीय ठरवावें, अशी मागणी करणारा एक ठराव श्री. अच्युतन् ह्यांनीं लोकसभेंत नुकताच मांडला होता. त्यावर बरीच चर्चा होऊन, मूळ ठरावाऐवजीं खालीलप्रमाणें ठराव लोकसभेनें मंजूर केला व तो सरकारनें मान्य केला. तो ठराव असा:—" दशमान पद्धतीचीं वजनें-मापें सबंद देशांत एकजात सुरू करण्यासाठी सरकारनें योग्य ती योजना करावी, असें ह्या सभेचें मत आहे."

चर्चेत भाग घेतांना, व्यापार-उद्योग खात्याचे मंत्री, श्री. कृष्णम्माचारी हे म्हणाले, कीं दशमान पद्धतीचीं नाणीं, वजनें व मापें भारतांत सुरू करावींत, असा नियोजन मंडळानें निर्णय घेतलेला आहेच. वजनें व मापें दशमान पद्धतीचीं करण्यापूर्वी, नाणीं त्या पद्धतीचीं प्रथम सुरू केलीं जातील व त्यासाठी अर्थमंत्री लवकरच एक बिल मांडतील. त्याच्या पूर्वतयारीसाठी व्यापार-उद्योग खात्याचे उपमंत्री श्री. कानुगो, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति नेमण्यांत आली आहे. राज्य सरकारांनीं ह्या निर्णयाच्या अंमलबजावणीचे कामीं सहकार्य करावें, ह्यासाठी त्यांना सूचना देण्यांत येत आहेत.

सध्याच्या नाण्यांचे ऐवजीं दशमान पद्धतीचीं नाणीं सुरू करणारें बिल मंत्री श्री. गुहा ह्यांनीं लोकसभेंत मांडलें. मध्यवर्ती सरकार गॅझेटांत जो दिवस जाहीर करील, त्या दिवसापासून नवीन नाणीं अंमलांत येतील. रुपया हेंच भारताचें प्रधान नाणें राहील, परंतु हल्लीं त्याचे १६ आणे होतात, त्याऐवजीं १०० सेंट होतील. दुय्यम नाण्यांना सेंट हेंच नांव राहील. सध्यांची अधेली म्हणजे ५० सेंट, पावली म्हणजे २५ सेंट, अशा प्रकारें दुय्यम नाण्यांत फरक होईल. इतर नाण्यांचें नातेंहि ह्याच हिशेबानें राहील. कांहीं काळपर्यंत जुनीं व नवीं, अशीं दोन्हीं नाणीं वापरांत रहातील.

दशमान पद्धतीचे फायदे सर्वमान्य आहेत; आणि ज्यांचा ह्या पद्धतीला विरोध दिसतो, तो मुख्यतः संक्रमणकाळांतील संभाव्य गोंधळाला आहे. दशमान पद्धतीनें हिशेब अति लवकर व सुलभतेनें करतां येतात आणि लहान मुलांवरील ताण कमी होतो. ही पद्धत शास्त्रशुद्धहि आहे.

युद्धकाळांत, भारतांत सर्वत्र दुय्यम नाण्यांची भयंकर चणचण झाली होती, निकेल व टिन ह्यांचा पुरवठा अपुरा पडला होता व लोकांमध्यें नाणीं साठवून ठेवण्याची प्रवृत्ति वाढली होती. ह्यावर उपाययोजना म्हणून सरकारनें जीं नाणीं प्रसृत केलीं, तीं अनेक दृष्टींनीं सोईचीं नाहींत असें आढळून आलें. निकेलचा पुरेसा पुरवठा होऊं लागताच, पूर्वीची क्युप्रो-निकेलचीं नाणीं पुनः सुरू करण्याचा सरकारचा विचार होता. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नाणीं पाडावीं लागलीं असतीं. सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें, नाण्यांच्या पद्धतींत सुधारणा करण्यास हा समय सोईचा होता व दशमान पद्धतीच्या नाण्यांची सूचना पुढें आली होती. दशमान पद्धतीचीं नाणीं सुरू करण्याचा भारत सरकारनें १९४५ सालीं प्रयत्न केला व एक बिलहि तयार केलें, परंतु त्यावेळच्या विरोधास मान देऊन सरकारनें मत अजमावण्यासाठी बिल व्यापक प्रसिद्धीसाठी पाठविलें. पुढें त्याबाबत कांहींच केलें गेलें नाहीं व बिल रद्द झालें. आतां मांडण्यांत आलेलें बिल १९४६ च्या बिलाच्या स्वरूपाचेंच आहे; एक पैशाखालील नाण्याची, म्हणजे पैची व्यवस्था १९४६ सालीं करणें जरूरीचें होतें; ती जरूरी आतां उरलेली नाहीं. कारण, युद्धकालीन व युद्धोत्तर किंमतीमधील वाढीमुळें पै एवढ्या लहान नाण्याला आतां व्यवहारांत स्थानच उरलेलें नाहीं.

दशमान पद्धतीच्या नाण्यांपेक्षा दशमान पद्धतीचीं वजनें-मापें सुरू करणें ज्यास्त अवघड आहे. कारण, सबंध भारतांतील नाणीं एकाच प्रकारचीं आहेत; तेव्हां रुपयाचें दशमान नाण्यांत रूपांतर करावयास एकच बदल पुरेसा होईल. वजनें व मापें ह्यांची गोष्ट तशी नाहीं. राज्यां-राज्यांत व जिल्ह्या-जिल्ह्यांत वेगवेगळीं वजनें व मापें चालू आहेत, त्या सर्वांचा दशमान पद्धतीशीं सुलभतेनें मेळ घालावा लागेल. कारखानदारींत सध्यां पौंड व इंच आहेत, त्यांची जागा दशमान पद्धतीचीं वजनें व मापें घेतील. यंत्रसामुग्री व सुटे भाग ह्यांच्या बाबतींत हा बदल रुळण्यास कालावधि लागेल. हें सर्व लक्षांत घेऊनच सरकारनें दशमान पद्धतीच्या नाण्यांस आपल्या कार्यक्रमांत प्राधान्य दिलें आहे.

एका आधारभूत नाण्याच्या अनुरोधानें मुख्यतः १० पटींनीं वाढणारीं नाणीं ज्या पद्धतींत असतात, तिला नाण्यांची दशमान पद्धत असें म्हणतात. उदाहरणार्थ, " एक " आधारभूत मुख्य नाणें मानलें, तर किंमतींत त्याचेवरील नाणीं " दहा " " शंभर," " हजार " अशीं होतील व त्याचे खालील नाणीं ·१, ·०१, ·००१ अशीं होतील. दशमान पद्धति पूर्णपणें अंमलांत असेल, तर अशा नाण्यांच्या व्यतिरिक्त इतर नाणीं आढळणारच नाहींत. फ्रान्समध्यें फ्रँक हें मुख्य नाणें आहे व १० फ्रँकचीं व १०० फ्रँकचीं, त्याचप्रमाणें १० सेंटिमचींहि नाणीं आहेत. परंतु, त्याबरोबरच, ५० फ्रँक, ५ फ्रँक, २ फ्रँक, ५० सेंटिम, अशींहि पण नाणीं आहेत. जर्मन आणि अमेरिकन नाण्यांच्या दशमान पद्धतींतहि अशाच प्रकारचीं नाणीं आढळतात.

हिंदी नाण्यांच्या नव्या, सुधारलेल्या पद्धतींतहि ह्याच तऱ्हेचीं सोइस्कर दुय्यम नाणीं ठेवावीं लागतील. परंतु, मुख्य हिशेबाच्या नाण्यांचें प्रमाण दशमान पद्धतीचें रहाणार, ही त्यांतील महत्त्वाची बाब आहे. कितीतरी पुढारलेल्या देशांनीं १९ व्या शतकांतच आपलीं नाणीं दशमान पद्धतीवर आणून ठेवलेलीं आहेत; ग्रेट ब्रिटनमध्यें ह्या विषयावर चर्चा अनेकवार झाली असेल पण भारतानें त्या बाबतींत प्रत्यक्ष पाऊल आतां टाकलें आहे. पावली खालील नव्या नाण्यांचे बाबतींतच नियोजित बदल जाणवण्याजोगा आहे. परंतु जुनीं व नवीं अशीं दोन्हीं नाणीं कांहीं काळ

प्रचारांत रहाणार असल्याकारणानें हा बदल क्रांतिकारक वाटणार नाहीं. त्याबाबत योग्य त्या मार्गानें सरकार प्रचार करील व लोकांना बदल समजावून सांगेल; तरीपण मागासलेल्या भागांत तरी ही सुधारणा पूर्णपणें पचनीं पडण्यास थोडा कालावधि लागला तर नवल नाहीं.

## छोट्या उद्योगधंद्यांचा विकास

म्हैसूरचे मुख्य मंत्री श्री. हनुमंतया ह्यांनीं राज्याच्या औद्योगिक विकासाविषयीं सल्ला देणाऱ्या बोर्डापुढें भाषण करतांना असें जाहीर केलें आहे कीं, जपानमधील छोट्या उद्योगधंद्यांचा अभ्यास करण्यासाठी एक प्रतिनिधिमंडळ राज्यातर्फे त्या देशांत पाठविण्यांत येणार आहे. ह्या मंडळांत १० ते १५ लोक असतील. त्यांतील कांहीं सरकारी प्रतिनिधी असतील व बाकीचे उद्योगधंद्यांचे असतील. श्री. हनुमंतया ह्या विषयासंबंधीं बोलतांना म्हणाले कीं, राज्याच्या ग्रामीण भागांत ज्या वस्तूंचा खप होतो त्या वस्तूंविषयीं तपासणी करण्यांत यावी. म्हणजे त्या वस्तू राज्यांतच तयार करण्यासंबंधीं विचार करतां येईल. ग्रामीण भागांतील जनतेला लागणाऱ्या वस्तू तयार करणारे छोटे उद्योगधंदे कशा रीतीनें चालवावे, तें समजून घेण्यासाठी अभ्यासकांचें प्रतिनिधिमंडळ पाठविण्यांत येत आहे. म्हैसूरचें सरकार दुसऱ्या पंचवार्षिक योजनेवर सुमारे १०० कोटी रुपये खर्च करण्याचा विचार करीत आहे. राज्यांतील कागद, सिमेंट आणि इतर प्रकारच्या उद्योगधंद्यांची उत्पादनक्षमता वाढविणें हा राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा उद्देश आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या प्रगतीबद्दल माहिती देतांना बोर्डाचे सेक्रटरी ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, आतांपर्यंत ३२ कोटी रुपये खर्च करण्यांत आले आहेत. चालू वर्षांत आणखी १२·८ कोटी रुपये खर्च करण्यांत यावयाचे आहेत.

## जमिनीची सुधारणा करण्याच्या योजना

मद्रास राज्याचे शेतकीमंत्री श्री. भक्तवत्सलम् ह्यांनीं उटकमंड येथें, जमिनीची सुधारणा करण्यासंबंधीं महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. सेंट्रल फॉरेस्ट्री बोर्डाच्या बैठकींत बोलतांना ते म्हणाले कीं, जमिनीची धूप थांबविण्यासाठी तांतडीचे उपाय योजण्यांत आले पाहिजेत. कांहीं एका मर्यादेच्या पुढें हें कार्य करतां येणें अशक्य होऊन बसेल. मद्रास सरकारनें जमिनीची सुधारणा करण्यासाठी कांहीं योजना आंखल्या आहेत. सुमारें १,९३,८०० एकर जमिनींत सुधारणा करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठी २४८·४८ लाख रुपये खर्च येईल, असा अंदाज आहे. निलगिरी भागांतील जमिनीची धूप थांबविण्यासाठी ६ वर्षे मुदतीची एक योजना तयार करण्यांत येत आहे. योजना अंमलांत आणण्यासाठी मध्यवर्ती सरकारच्या मदतीची अपेक्षा आम्हीं करीत आहोंत. ही योजना निलगिरी भागांतील लागवडीखाली असलेल्या सर्व जमिनीला लागू करण्यांत येणार आहे. सर्व योजना पुरी करण्यास १·२५ कोटी रुपये खर्च येईल. ज्या ज्या ठिकाणीं जमिनीची धूप होत आहे त्या त्या सर्व भागांत ती थांबविण्याचे उपाय योजण्यांत आले पाहिजेत. जमिनीची धूप थांबविण्याचा कार्यक्रम दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यांत यावा. राज्य–सरकारांना हीं कामें करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें आर्थिक मदत देणें आवश्यक आहे. जमिनीची धूप थांबविण्यामुळें उत्पादनांत सहजच वाढ होते.

## सहकारी संस्थांना आवाहन

गुजरातमधील साबरकंठा डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह कॉन्फरन्सचें अधिवेशन हिम्मतनगर ह्या ठिकाणीं भरलें होतें. भारतीय सरकारचे मागासलेल्या वर्गाचे कमिशनर श्री. एल. एम्. श्रीकांत हे अध्यक्षस्थानीं होते. अध्यक्षीय पदावरून भाषण करतांना ते म्हणाले कीं, आवडी येथें भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत समाजवादी पद्धतीची समाजरचना करण्याचें घोषित करण्यांत आलें आहे. हें ध्येय साध्य करण्यासाठी फक्त सहकारी प्रयत्नच परिणामकारी होतील. सहकारी संस्थांनीं व्यापार-व्यवहारांत जें स्थान दलाल अडवून बसले आहेत तें पटकविलें पाहिजे. शेतकऱ्याला पतीवर मदत देऊन आणि त्याचा माल बाजारपेठेंत आणण्याची व्यवस्था करून त्यांनीं त्याला साह्य केलें पाहिजे. खेड्यांतील लोक ज्या मालाचें उत्पादन करतात तो विकण्यासाठी योग्य प्रकारच्या संस्था नाहींत. त्यामुळें दलालाला आपले पाय रोवण्यास संधि मिळते. दलाल खेडुतांना त्यांचा न्याय्य वांटा देत नाहींत आणि जवळ जवळ सर्व नफा आपणच घेतात. भारतीय सरकारनें इंपीरिअल बँक आपल्या मालकीची करण्याचें ठरविलें आहे. देशांतील ग्रामीण भागांतील जीवनाची सुधारणा करण्याच्या दृष्टीनें हें क्रांतिकारक पाऊल आहे. हें पाऊल टाकण्यांत ग्रामीण भागांतील लोकांना पतीवर व्यवहार करण्याची सोय उपलब्ध करून देणें हा हेतु आहे. खेड्यांतील लोकांना कर्जे देतांना व्याज कमी दरानें आकारण्यांत यावें. त्याचप्रमाणें पतीवरील व्यवहारांचा बाजारपेठेशीं संबंधहि जोडण्यांत यावा.

## आशिआचा विकास आणि व्यापार वृद्धि

इंटर–नॅशनल चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेची १५ वी काँग्रेस टोकिओ येथें भरविण्यांत आली होती. संस्थेच्या कार्यसमितीची पहिली बैठक भारतीय प्रतिनिधी–मंडळाचे नेते श्री. लालजी मेऱ्होत्रा ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. परिषदेसाठी जगाच्या निरनिराळ्या भागांतून ८०० औद्योगिक पुढारी आले होते. त्या सर्वांनीं मिळून असें मत व्यक्त केलें कीं आशिआची औद्योगिक प्रगति जसजशी होऊं लागेल तसतसा जगांतील राष्ट्रांच्या दरम्यान होणारा व्यापारहि वाढूं लागेल. आशिआंतील राष्ट्रांच्या दरम्यान अधिक व्यापार घडवून आणण्यासाठी त्यांनीं मुख्यतः तीन मुद्यांवर जोर दिला. (१) प्राथमिक स्वरूपाच्या मालाच्या किंमती स्थिर करणें (२) निरनिराळ्या राष्ट्रांच्या विकासांचे कार्यक्रम परस्परांशीं सुसंगत करणें आणि (३) व्यापारी करारांत नव्या परिस्थितीप्रमाणें बदल करणें. श्री. आर. जी. सरय्या ह्यांनीं आशिआचा औद्योगिक विकास आणि जागतिक अर्थव्यवस्था ह्या विषयासंबंधीं आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, आशिआंतील राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था एकमेकांना पूरक अशा नसून स्पर्धमान अशा आहेत. त्यामुळें आज बिगर आशिआई देशांकडे व्यापाराचा ओघ अधिक प्रमाणांत वाहतांना दिसतो. शेती, उद्योगधंदे आणि वहातूक ह्या बाबतींत आशिआंतील राष्ट्रांनीं जर परस्पर-प्रगति केली तर त्यांच्यांत होऊं शकणाऱ्या व्यापाराला फार मोठा वाव मिळण्यासारखा आहे. पण त्यासाठी किंमती स्थिर राखण्याच्या योजनांची जरूर आहे.

**विजेच्या गाड्यांसाठी डबे**—मुंबई व उपनगरें ह्यांच्यांतील वहातुकीकरितां उपयोग करण्यासाठी रेल्वे बोर्डानें विजेच्या गाड्यांच्या ५० डब्यांची मागणी इटलींतील एका कारखान्याकडे नोंदविली आहे. सर्व डब्यांची मिळून किंमत सुमारें २ कोटि रुपये होईल.

## ज्यानें पत्र पाठविलें त्याचा एजंट, अशी पोस्टाची भूमिका

### मुंबई हायकोर्टाचा महत्त्वाचा निवाडा

ज्याला पत्र पाठविलें असेल, त्याचा पोस्ट ऑफिस हें एजंट म्हणून केव्हां समजलें जातें, ह्याबाबत एक महत्त्वाचा निर्णय मुंबई हायकोर्टाच्या फुलबेंचानें दिला आहे.

एका सावकारानें बी. ए. डी. आर. कायद्याखालीं ३१ जुलै, १९४७ या दिवशीं जळगांवाहून एरंडोल कोर्टाला रजिस्टर्ड पोस्टानें अर्ज पाठवला. तो अर्ज कोर्टाला १ ऑगस्ट, १९४७ या दिवशीं म्हणजे दुसऱ्या दिवशीं पोंचला. हा अर्ज १ ऑगस्ट, १९४७ पूर्वी पोंचावयास हवा होता असें या प्रकरणीं काढण्यांत आलेल्या हुकुमांत म्हटलें होतें. त्याप्रमाणें हा अर्ज योग्य मुदतींत दाखल झाला आहे, असें एरंडोल कोर्टानें ठरविलें.

डिस्ट्रिक्ट कोर्टानें हा अर्ज मुदतींत दाखल झाला नाहीं, असा निर्णय दिला.

सावकारानें हायकोर्टाकडे रिव्हिजन अर्ज केला. न्या. गजेंद्रगडकर व न्या. शहा ह्यांनीं हें अपील फुलबेंचाकडे पाठविलें. फुलबेंचांत न्या. छगला, न्या. दीक्षित व न्या. देसाई हे होते.

"पत्र ज्याला पाठवावयाचें, त्यानें एखादें पत्र किंवा कागद पोस्टानें पाठविण्यास पाठविणाराला सांगितलें, तर पोस्ट ऑफिस तें पाठविणाराचा एजंट बनतें. म्हणून, पाठविणारानें पत्र किंवा कागद पोस्टाच्या हवालीं केल्याबरोबर, तें ज्याला पाठवावयाचें, त्याला ते मिळाले असें कायद्यानें समजलें जातें. दोन खासगी व्यक्तींचे बाबतींत जें तत्त्व लागूं, तें कोर्टासहि लागूं आहे. अर्थात् त्या कोर्टानें विशिष्ट अर्ज पोस्टानें पाठविण्यास संमति दिलेली असली पाहिजे.

"बॉंबे डेटर्स रिलीफ ॲक्टाच्या ४ (२) ह्या कलमानें, अर्ज सांगितल्याप्रमाणें दाखल करावा असें सांगितलें आहे. सरकारनें तयार केलेल्या नियमांतील ४ थ्या नियमानें, अर्ज दाखल करण्याची पद्धति दिली आहे. त्यांत म्हटलें आहे कीं, अर्जदारानें स्वतः किंवा रजिस्टर्ड पोस्टानें कोर्टास अर्ज सादर करावा. ४थ्या नियमाप्रमाणें, कोर्टाचें पोस्ट ऑफिस हें एजंट बनलें हें उघड आहे. म्हणून, अर्जदारानें ३१ जुलै, १९४७ रोजीं रजिस्टर्ड पोस्टानें अर्ज धाडला, तो कोर्टासच त्या दिवशीं दाखल झाला, म्हणून तो मुदतींत आहे." ह्या संबंधांतील हायकोर्टाचे तीन निवाडे (C. R. A. ६२०–१९४७, C. R. A. ४९०–१९५१ व C. R. A. ४३६–१९५२) फुल बेंचनें फिरविले. ह्या तीनहि निवाड्यांत ह्याविरुद्ध अभिप्राय व्यक्त केलेला होता. मूळ एरंडोल कोर्टाचा निवाडा फुलबेंचानें उचलून धरला.

---

### डॉक्टरांच्या आवडत्या पोपटाची प्रेतयात्रा

मुरादाबाद येथील एका यशस्वी होमिओपाथीचे डॉक्टरांचा आवडता पोपट नुकताच मरण पावला. डॉ. टी. एल. सक्सेना हे त्या डॉक्टरांचें नांव. त्यांनीं एका गाडींत बसून पोपटाला मांडीवर घेतलें व मोठ्या मिरवणुकीनें त्याला नेऊन हिंदु संस्काराप्रमाणें त्याला पुरलें. डॉक्टरांचे जवळ हा पोपट १५ वर्षें होता. डॉक्टर हे स्वतः विधुर होते व त्यांना पोपटाचा इतका लळा होता, कीं ते १४ वर्षांत गांवाबाहेर एकदांहि गेले नाहींत; पोपटाची संगत सोडणें त्यांना अशक्य होतें. शोकाकुल डॉक्टरांनीं पोपटाच्या मृत्यूनंतर तीन दिवस अन्न घेतलें नाहीं व व्यवसायाहि केला नाहीं. ते आतां यात्रेला जाणार आहेत, असें समजतें.

## श्री. गांडेकर ह्यांचा सत्कार

### पूना बँकिंग असोसिएशनमधील समारंभ

दि पूना बँकिंग असोसिएशनचे ऑनररी सेक्रेटरी, श्री. दा. ना. गांडेकर (मॅनेजर, न्यू सिटिझन बँक, पुणें) हे रिझर्व्ह बँकेच्या ऑफिसर्स ट्रेनिंग कॉलेजचा अभ्यासक्रम यशस्वी रीतीनें पुरा करून आले, त्याबद्दल असोसिएशननें त्यांच्या अभिनंदनाप्रीत्यर्थ एक थाटाचा समारंभ घडवून आणला. दि. १८ मे रोजीं, पुणें सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत श्री. दा. वा. पोतदार, (रिझर्व्ह बँकेच्या स्थानिक सल्लागारमंडळाचे सदस्य) ह्यांच्या अध्यक्षतेखालीं अभिनंदनाची सभा भरविण्यांत आली, तिला पुण्यांतील प्रतिष्ठित बँकर्स उपस्थित होते. श्री. जोग ह्यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर अध्यक्षांच्या सूचनेवरून श्री. क्षीरसागर ह्यांनीं असोसिएशनच्या कार्याचा थोडक्यांत आढावा घेतला. त्यानंतर श्री. के. पी. जोशी, श्री. जमदग्नी, श्री. कृष्णस्वामी, श्री. मुजुमदार, श्री श्री. वा. काळे, श्री. डी. डी. चितळे, श्री. जी. जी. साठे, श्री. खन्ना, इत्यादींनीं श्री. गांडेकर ह्यांच्या गुणवर्णनपर भाषणें केलीं. श्री. गांडेकर ह्यांनीं आपल्या आभाराच्या भाषणांत ऑफिसर्स ट्रेनिंग कॉलेजाच्या कार्यपद्धतीची थोडक्यांत पण उद्बोधक अशी माहिती सांगितली व त्याबाबत तपशीलवार माहिती देण्यासाठी सभासदांच्या आग्रहास अनुसरून एक व्याख्यानमाला गुंफण्याचें आश्वासन दिलें. अध्यक्षांनीं बँकांच्या अधिकाऱ्यांना बँकिंगच्या धंद्याची सूक्ष्म व व्यवहारशुद्ध माहिती असण्याचें अगत्य प्रतिपादन केलें. बँकांच्या संचालकांसाठीहि अशा एखाद्या ट्रेनिंग कॉलेजाची आवश्यकता आहे, असें त्यांनीं मत व्यक्त केलें. श्री. साळवेकर ह्यांनीं योग्य शब्दांत आभार मानल्यावर, अल्पोपहारानंतर हा समारंभ संपला. पूना बँकिंग असोसिएशननें आपल्या कार्यक्षम व उत्साही ऑनररी सेक्रेटरीचा सत्कार करण्यांत औचित्यच दाखविलें, असें उपस्थितांचें साहजीकच म्हणणें होतें.

---

### दहा दिवसांत ७,००० कोटी रुपयांच्या बजेटास मंजुरी देण्याचा विक्रम

ब्रिटिश सरकारनें आपलें अंदाजपत्रक १९ एप्रिल रोजीं पार्लमेंटला सादर केलें. ह्याबाबत फिनॅन्स बिलाचें तिसरें वाचन २९ एप्रिल रोजीं मंजूर झालें. अंदाजपत्रक मांडणें, त्यावर चर्चा होणें, व तें मंजूर होणें ह्या सर्व क्रिया इतक्या थोड्या दिवसांत ह्यापूर्वी कधींहि पुऱ्या झालेल्या नव्हत्या. १९२९ मध्येंहि घाईनें बजेट मंजूर करण्यांत आलें, पण त्यानें ह्यापेक्षा ज्यास्त दिवस घेतले होते. त्या अंदाजपत्रकाचे मानानें आतांचें अंदाजपत्रक कितीतरी पट अधिक खर्चाचें आहे! १९२९ सालीं, तेव्हांचे अर्थमंत्री, विन्स्टन चर्चिल, ह्यांनीं २० मे, १९२९ रोजीं होणारी निवडणूक जिंकण्याचे दृष्टीनें चहावरील कर रद्द केला. पहिल्या एलिझाबेथच्या वेळेपासून हा कर चालू होता. हा नकोसा कर रद्द केला, तरी निवडणुक मजूर पक्षानेंच जिंकली! चालू अंदाजपत्रकांत अशी मखलाशी करण्यांत आलेली नाहीं.

---

### सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्ग इंदापूरचा उद्घाटन समारंभ

पुणें जिल्हा सहकारी बोर्डाच्या विद्यमानें इंदापूर येथें सुरू होणाऱ्या सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्गाचें उद्घाटन आमदार ग. स. खरात यांचे हस्तें ता. १३–५–५५ रोजीं झालें.

## इन्कमटॅक्स् कायद्याखालील जाहीर नोटीस व आपली जबाबदारी

दरवर्षी एप्रिल महिन्यांत इन्कमटॅक्स अधिकाऱ्याकडून एक जाहीर नोटीस प्रसिद्ध केली जाते. इन्कमटॅक्स कायद्यान्वयें ही नोटीस अत्यंत महत्त्वाची आहे. चालू वर्षाकरितां अशा प्रकारची नोटीस ता. २१ एप्रिल १९५५ रोजीं बऱ्याच वर्तमानपत्रांतून प्रकाशित झाली आहे.

### इन्कमटॅक्सचें पत्रक कोणी भरावें ?

इन्कमटॅक्स अधिकाऱ्यानें प्रकाशित केलेल्या जाहीर नोटीशी-अन्वयें ज्यांची मागील वर्षातील एकूण प्राप्ति आकारणीस पात्र नसलेल्या जास्तींत जास्त रकमेहून अधिक असेल अशा प्रत्येक इसमानें आपलें एकूण उत्पन्न व आपलें एकूण जागतिक उत्पन्न कायद्यानें अधिकृतपणें ठरवून दिलेल्या पत्रकांत भरून पाठविलें पाहिजे.

### नोटीस नसतां पत्रक भरणें

सध्यां १९५५-५६ हें आर्थिक वर्ष सुरू आहे. या आर्थिक वर्षाच्या 'मागील वर्षांत' ज्या व्यक्तींचें उत्पन्न करपात्र मर्यादेपेक्षा जास्त आहे अशा प्रत्येक व्यक्तीनें आपल्या उत्पन्नाचें पत्रक भरून पाठविणें आवश्यक आहे.

आजपर्यंत जे लोक इन्कमटॅक्स भरीत आले असून ज्यांच्या नांवांची नोंद इन्कमटॅक्स ऑफिसांत आहे, अशांना इन्कमटॅक्स कायद्याच्या कलम २२ (२) अन्वयें उत्पन्नाचें पत्रक भरण्या-विषयीं वैयक्तिक नोटीस काढली जाते. ही वैयक्तिक नोटीस मिळाल्यापासून ३५ दिवसांच्या आंत पत्रक भरून पाठवलें पाहिजे. परंतु जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर वैयक्तिक नोटीशीची वाट न पाहतां जाहीर नोटीशींत नमूद केलेल्या मुदतींत (नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ६० दिवसांचे आंत) उत्पन्नाचें पत्रक भरून पाठवणें चांगलें.

### 'मागील वर्ष' म्हणजे काय ?

मागील वर्षाविषयीं जास्त खोलांत न शिरतां सोप्या शब्दांत मागील वर्षाचा अर्थ पुढीलप्रमाणें लावतां येईल.

"कोणत्याहि व्यक्तीनें आपले जमाखर्च ज्या वर्षाकरितां ठेवले आहेत व जें वर्ष ता. ३०-३-५५ अगर त्यापूर्वी संपत आहे असें जमाखर्चाचें वर्ष सन १९५५-५६ या आर्थिक वर्षाचें मागील वर्ष होय. उदाहरणार्थ, जर आपण संवत् वर्षाप्रमाणें आपले जमाखर्च ठेवले असतील तर संवत् २०१० हें वर्ष सन १९५५-५६ च्या मागील वर्ष होईल; याच पद्धतीनें प्रत्येकानें ठेवलेल्या जमाखर्चाच्या वर्षाप्रमाणें मागील वर्ष ठरवितां येईल.

### प्राप्तीची किमान मर्यादा

सध्यांच्या इन्कमटॅक्स कायद्याप्रमाणें ठराविक शर्ती पूर्ण असलेल्या एकत्र हिंदु कुटुंबाच्या बाबतींत वांटणी मागणारे दोन सभासद असतील तर किमान करपात्र उत्पन्नाची मर्यादा ८,४०० (आठ हजार चारशें) रुपये आहे व चार सभासद असल्यास १२,६०० आहे. कंपनी, स्थानिक संस्था किंवा भारतांत न राहणाऱ्या व्यक्तींच्या बाबतींत किमान मर्यादा कांहींहि न ठेवल्यानें त्यांचें उत्पन्न कितीहि असलें तरी त्यांनीं उत्पन्नाचें पत्रक भरून पाठविणें आवश्यक आहे. एकत्र हिंदु कुटुंबाचें उत्पन्न ८,४०० रुपयांपेक्षा जास्त असल्यास त्यांनीं उत्पन्नाचें पत्रक स्वतः होऊन भरलें पाहिजे व इतरांचें उत्पन्न ४,२०० रुपयांपेक्षा जास्त असेल तर त्यांनींहि आपल्या उत्पन्नाचें पत्रक भरलें पाहिजे. तसेंच जर कोणत्याहि भागीदारीच्या धंद्याचें उत्पन्न ४,२०० रुपयांपेक्षा जास्त असेल, परंतु प्रत्येक भागी-दाराच्या हिश्यास येणारें उत्पन्न ४,२०० रुपयांपेक्षा कमी असेल तरीसुद्धां भागीदारानें स्वतः होऊन पत्रक भरून पाठविणें आवश्यक आहे.

### पत्रक पाठविणेची मुदत

इन्कमटॅक्स कायद्याखालीं उत्पन्नाचें पत्रक भरून मागविण्या-करितां जी जाहीर नोटीस प्रसिद्ध केली जाते त्यांत उत्पन्नाचें पत्रक भरून पाठविण्याकरितां कमींत कमी ६० दिवसांची मुदत दिलेली असते. परंतु प्रचारांत मात्र हीच मुदत ६५ दिवसांची आहे. ज्यांचें मागील वर्षातील एकूण उत्पन्न कर आकारणीस पात्र नसलेल्या जास्तीत जास्त रकमेहून अधिक असेल अशा प्रत्येक इसमानें जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ६५ दिवसांचे आंत पत्रक भरून पाठवावें. सदरच्या मुदतींत पत्रक भरणें योग्य कारणाकरितां अशक्य असल्यास वरील मुदत संपण्याच्या आंत आपल्या हद्दींतील इन्कमटॅक्स ऑफिसरकडे अर्ज करून पत्रक भरण्यासाठीं मुदत मागून घ्यावी.

### उत्पन्न करपात्र मर्यादेपेक्षाहि कमी असतां नोटीस आल्यास

जर कोणत्याहि व्यक्तीचें आर्थिक वर्षाच्या मागील वर्षातील उत्पन्न ठराविक मर्यादेपेक्षा कमी असेल व त्यांस इन्कमटॅक्स अधिकाऱ्याकडून कलम २२ (२) खालीं पत्रक भरून पाठविण्याची नोटीस आली असेल तर अशा व्यक्तीनें आपलें उत्पन्न करपात्र मर्यादेपेक्षा कमी असलें तरीसुद्धां नोटिशींत दिलेल्या मुदतींत उत्पन्नाचें पत्रक भरून पाठवणें आवश्यक आहे.

### पत्रक न भरल्यानें होणारा दंड

उत्पन्नाचें पत्रक भरावयास पात्र असतांनासुद्धां जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून योग्य मुदतींत पत्रक भरून न पाठविल्यास आपणांस भराव्या लागणाऱ्या इन्कमटॅक्स व सुपरटॅक्सच्या रकमेच्या दीडपट इतका दंड इन्कमटॅक्स कायद्याच्या कलम २८ अन्वयें होऊं शकतो. तरी सर्व संबंधितांनीं आपलें उत्पन्नाचें पत्रक वेळेवर भरण्याची दक्षता घ्यावी.

—व्यापारी मित्र, १९५५

---

### मुख्य मंत्र्यांनीं सोफे व पडदे काढून टाकले

काँग्रेसच्या समाजवादी धोरणास अनुसरून, मध्यभारताचे मुख्यमंत्री श्री. तख्तमल जैन, ह्यांनीं आपल्या सरकारी घरांतील (सफेत कोठी) फक्त दोन तीन खोल्या स्वतःकडे ठेवल्या आहेत व उरलेला बंगला इंदूर येथें येणाऱ्या बड्या पाहुण्यांना उतरण्यासाठीं ठेवला आहे. घरांतील सोफे, गादीच्या खुर्च्या, इत्यादि चैनीच्या वस्तू काढून टाकण्यांत आल्या आहेत. दारा-खिडक्यांना पडदे लावले जाणार नाहींत.

---

### टाटांची परदेशी कर्जासाठीं खटपट

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीची उत्पादनक्षमता वाढ-विण्यासाठीं ६० ते ७० कोटी रुपयांचें कर्ज मिळविण्याकरितां कंपनीचे चेअरमन श्री. जे. आर. डी. टाटा व व्हाइस चेअरमन श्री. जे. डी. चोक्सी, हे १२ मे रोजीं विमानानें अमेरिकेस जाण्यासाठीं निघाले. जागतिक बँकेकडून कर्ज घेण्यापेक्षा खासगी कर्ज मिळालें तर अधिक चांगलें, असें श्री. चोक्सी हे जातांना म्हणाले.

### इंटरनॅशनल फिनॅन्स कॉर्पोरेशन

जागतिक बँकेच्या, वरील संलग्न संस्थेच्या चार्टरचा मसुदा बँकेच्या सभासद राष्ट्रांकडे पाठविण्यांत आला आहे. ज्या देशांना कॉर्पोरेशनचें सभासदत्व हवें असेल, त्यांनीं जरूर ते कायदे किंवा ठराव करून भाग भांडवलाचे पैसे भरावयाचे आहेत.

सभासद्–राष्ट्रांस, विशेषतः अविकसित राष्ट्रांस आर्थिक प्रगति घडवून आणण्यास मदत करणें, हा कॉर्पोरेशनचा उद्देश आहे. म्हणजेच जागतिक बँकेच्या कार्यास कॉर्पोरेशनचें कार्य पोषक असेंच होईल.

जागतिक बँकेच्या सभासद्–राष्ट्रांनाच फक्त कॉर्पोरेशनचे सभासद् होता येईल. कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल १० कोटी डॉलर राहील. जागतिक बँकेचे ज्या प्रमाणांत भाग घेतले असतील, त्याच प्रमाणांत कॉर्पोरेशनचे भाग सभासद्–राष्ट्रांना मिळूं शकतील. अधिकृत भांडवल प्रत्येकीं १,००० डॉलर्सच्या १,००,००० भागांत विभागलेलें आहे.

सहाजिकच, युनायटेड स्टेट्स सर्वांत ज्यास्त भाग धारण करील. त्याचे खालोखाल ग्रेटब्रिटनचा अनुक्रम लागेल. ३० राष्ट्रांच्या सरकारांनीं एकूण किमान ७·५ कोटी डॉलर्सचे भाग घेतले, कीं कॉर्पोरेशन आस्तित्वांत येईल. कांहीं महत्त्वाच्या राष्ट्रांना किती भांडवल उपलब्ध होईल. ह्याचे आंकडे खालीं दिले आहेत.

| देश | लक्ष डॉलर्स | देश | लक्ष डॉलर्स |
|---|---|---|---|
| यु. स्टेट्स् | ३५१ | जपान | २८ |
| ग्रेट ब्रिटन | १४४ | ऑस्ट्रेलिया | २२ |
| चीन | ६६ | इटली | २० |
| फ्रान्स | ५८ | इंडोनेशिया | १२ |
| भारत | ४४ | ब्राझील | ११ |
| जर्मनी | ३६ | पाकिस्तान | ११ |
| कॅनडा | ३६ | स्वीडन | ११ |
| नेद्रलँडस् | ३० | द. आफ्रिका | ११ |
| बेल्जम | २५ | डेन्मार्क | ८ |

### LORD REAY MAHARASHTRA INDUSTRIAL MUSEUM

Has received the following new books :—

(1) **The Care of Farm Animals**: by F. Fraser Darling, Publisher Oxford University Press, London. pp. 112. Price 5 Shillings.

(2) **Farm Tools and Machinery**: by H. J. Hine, Publisher- Oxford University Press, London pp. 128. Price 5 Shillings.

(3) **The Honey Bee** : by C. G. Buller, Publisher- Oxford University Press, London pp. 139.

(4) **Land Is What We Make It**; by Earnest Manners Publishers: G. G. Harrap and Co. Ltd. London, pp. 256. Price 12 Shillings.

(5) **Science and the Human Immagination**: by Mary B. Herse. Publishers, SCM Press, London, pp. 171. Price : 12s. 6d.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
स्थापना : १९१८
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रु. ७,२९,०००
रिझर्व रु. ६,०५,६००
ठेवी रु. १,२५,००,०००
शाखा – दादर, माहीम, बेळगांव, पुणें

अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—गुलवाडी, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.
शेड्यूल्ड बँक

स्थापना : १९३५
अध्यक्ष—श्री. वा. पुं. वर्दे
खेळतें भांडवल—रु. पांच कोटींचे वर
शाखा :
अहमदनगर, अमरावती, मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व जव्हेरी बाजार), भिवंडी, चाळिसगांव, धुळें, हरिहर (म्हैसूर सं.), हुबळी, द. हैद्राबाद, जळगांव, कल्याण, कोल्हापूर, कोपरगांव, नागपूर, नाशिक, पनवेल, पुणें (भवानी पेठ, डेक्कन जिमखाना व खडकी), रत्नागिरी, सांगली, सोलापूर, श्रीरामपूर व ठाणें.
★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
मुख्य कचेरी:– थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.
चिं. वि. जोग, मॅनेजर.

### वधूवरांच्या निवडीसाठी बोलपटांचा उपयोग

पति किंवा पत्नी मिळविण्यासाठी वधू-वर मंडळांचा वाढत्या प्रमाणावर उपयोग केला जात आहे. ह्या मंडळांत कांहीं फी भरून नांवें नोंदवावयाची आणि ठराविक रकाने भरून द्यावयाचे अशी पद्धत असते. ह्या माहितीवरून वराची किंवा वधूची खरी कल्पना येणें अशक्य असतें. सर्वच वधूंचें वर्णन गोरी, निमगोरी, तरतरीत, हुशार, खेळणारी, उंच, चलाख, असें केलेलें असतें तर वर हे मिळवते, सशक्त, असे कागदोपत्रीं आढळतात. त्यामुळें वर आणि वधू ह्यांची प्रत्यक्ष भेट झाली, म्हणजे अपेक्षाभंग होतो, असें फार वेळां घडतें. ह्यावर उपाय म्हणून जर्मनीमधील एका वधू-वर मंढळाच्या चालकानें फिल्म्सचा उपयोग करण्यास प्रारंभ केला आहे. ह्या फिल्म्स दाखविण्यास पाठविण्यापूर्वी संबंधित वधू–वराची संमति घेतली जाते. ह्या फिल्ममध्यें मंडळाच्या गिऱ्हाइकांची चालण्याची, बसण्याची, हातवारे करण्याची पद्धति दाखविली जाते; त्याचप्रमाणें त्यांची आवाज व बोलण्याची रीत हीहि स्पष्ट होते. प्रथम फोटो, नंतर फिल्म व नंतर आवाज, ह्या पद्धतीनें वधू व वर ह्यांची चाचणी होऊं शकते. वधू आणि वर ह्यांची प्रत्यक्ष भेट होण्यापूर्वी त्यांना एकमेकाचा चेहरा, हावभाव, आवाज, हीं पसंत पडलेलीं असतात; पुढचें काम वधू–वर मंडळाला करण्याची पाळी येतच नाहीं! अशा फिल्म्सचा येथील मंडळें उपयोग करूं लागलीं, तर पुण्याच्या मुलाला व नागपूरच्या मुलीला आज प्रत्यक्ष पहाण्याच्या समारंभांत माहिती मिळूं शकत नाहीं, ती बोलपटांच्या द्वारा आधींच मिळूं शकेल आणि कित्येक दोष आज फार उशीरा उघडकीला येतात, ते योग्य वेळींच प्रकट होतील. सामान्य मुलींना आज पहाण्याच्या समारंभांत केवळ पातळानें व वेण्याच्या शेपट्यांनीं छाप पाडतां येते, तशी बोलपटांत पाडतां येणार नाहीं, हें उघड आहे. त्यांना अधिक कठीण कसोटीला उतरावें लागेल व स्पर्धा तीव्रतर होईल. मुलांनाहि केवळ इस्त्रीच्या शर्ट-पँटचें भांडवल पुरणार नाहीं.

"सह्याद्रि"

---

### उपकाराची फेड न करण्यास विलंबाची सबब कशाला!

१९१४–१८ च्या महायुद्धाचे वेळीं, टांगानिकामधील जर्मन लष्करावर बाँब टाकण्यांत गुंतलेला वैमानिक कॅप्टन जी. डब्ल्यु. टी. गॅरुड, याला विमानाच्या इंजिनानें दगा दिल्यामुळें, जंगलांत नाइलाजानें उतरावें लागलें. त्याचा आक्रोश ऐकून दोघे आफ्रिकन टोळीवाले त्याच्या मदतीला धांवले व त्याला आपल्या खेडेगांवांत घेऊन गेले. त्यांनीं जवळच्या ब्रिटिश लष्करी इस्पितळाला वर्दी दिली व अशा रीतीनें त्याचा जीव बचावला. ४० वर्षांपूर्वीच्या ह्या उपकाराची फेड कॅप्टन गॅरुडनें नुकतीच केली आहे. केपटाउन पासून ३,००० मैलांवरील जंगली टापूंत तो गेला, पण जुनें खेडें आतां अस्तित्वांतच नसल्याचें त्याला सांगण्यांत आलें. नवी वस्ती त्यानें शोधून काढली. तेथें त्याला त्याच्या हितकर्त्यांपैकी एकाची गांठ पडली. ७० वर्षांच्या एका म्हाताऱ्यास त्यानें ओळखलें. सबंध गांवाला मेजवानी देण्यास पुरेल एवढे पैसे त्यानें त्या म्हाताऱ्याला दिले व त्यांतील सर्व मुलामुलींना खेळणीं व खाऊ वाटला. नवी वस्ती व जुना म्हातारा हुडकण्यासाठी वैमानिकाला दोन महिने खर्चावे लागले; हिंस्त्रो व हत्ती ह्यांनीं मूळ खेडेगांव उध्वस्त करून टाकलें होतें. कोणतेंहि सत्कृत्य करण्यास फार विलंब झाल्याची सबब कशाला, हेंच खरें.

"सह्याद्रि"


## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉपिन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा:

ब्रँच सेक्रेटरी.

---

म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी!!

## दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७

हयातीनंतरच्या विम्यास: ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

९७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई — शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

---

## —आपली पत सुरक्षित करा—

★ उद्योगधंद्यामध्यें माल, वाहनें वगैरेंचे विमे तत्परतेनें घेतले जातात. पण ज्या शब्दावर व पतीवर धंद्यांतील सर्व उलाढाल अवलंबून असते ती न कळत असुरक्षित ठेवली जाते, त्याची तरतूद आजच करा.

★

अधिक माहितीकरितां आजच शाखाधिकाऱ्यांना भेटा अगर लिहा.

★

—फोन नं. ३४०१—

## वेस्टर्न इंडिया विमा कं. लि. सातारा

पुणें शाखा :— वेस्टर्न इंडिया हाऊस, लक्ष्मी रस्ता, पुणें २.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.